# श्रमिक महिला संघाचे दुसरे अधिवेशन

कोल्हापूरची प्रसिद्धी शाहूमहाराजांनी केलेल्या सुधारणांसाठी असेलही पण कोल्हापूरच्या आसपास आहेत त्या यंत्रमाग, हातमागावर काम करणाऱ्या स्त्रिया, १।-२ रुपये शेतमजूरीवर राबणाऱ्या शेत-मजूर स्त्रिया, तंबाखू कामगार स्त्रिया; सरंजामी संस्कृतीच्या पीळात स्त्रीला चीपाड करून टाकणाऱ्या याच कोल्हापूर शहरात श्रमिक महिला संघाचे दुसरे अधिवेशन झाले.

कोल्हापूरमधील बिंदु चौकाजवळील एका शाळेत २९-३० मे रोजी अधिवेशन झाले. अधिवेशनाच्या स्थळाला सावित्रीबाई फुले नगर असे नाव दिले होते. या अधिवेशनाला श्रमिक महिला संघाच्या ठाणे, मुंबई, पुणे, कुलाबा, रत्नागिरी, बीड, कोल्हापूर सांगली इ. जिल्ह्यातील प्रतिनिधी आल्या होत्या. आदीवासी स्त्री यंत्रमाग कामगार, बिडी कामगार, शेतमजूर स्त्रिया, नर्स, प्राध्यापक, इतर कर्मचारी, अन्य फॅक्टरीतील कामगार स्त्रिया या विभागातून स्त्री प्रतिनिधी आल्या होत्या.

दि. २९ मे रोजी सकाळी ठाणे जिल्ह्यातील श्रमिक महिला संघाच्या कार्यकर्त्या हेमलता कोम यांच्या हस्ते जनवादी महिला सघटनेचा झेंडा फडकवण्यात आला. स्त्रीचे चित्र आणि 'लोकशाही समानता, आणि स्त्री मुक्ती' असे शब्द असलेला पांढऱ्या रंगाचा झेंडा फडकला आणि कार्यक्रमाला प्रारंभ झाला. कोल्हापूरमधील श्रमिक महिला संघाच्या कार्यकर्त्या सुशीलाबाई शेडबाळे यांनी प्रास्ताविक केले. कोल्हापूरमधील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्या व संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक लढाऊ कार्यकर्त्या आशाताई सोलापूरे यांनी अधिवेशनाचे उद्घाटन केले. उद्घाटनाच्या भाषणात त्यांनी स्त्रियांनी एकजूट करून अन्यायाविरूद्ध प्रतिकार केला पाहिजे असे सांगितले. त्यांच्या कामातील अनेक अनुभव, स्त्रिला समाजात कसे वागवले जाते याची रोजची उदाहरणे दिलेले त्यांचे भाषण जिवंत झाले.

उद्घाटनानंतर श्रमिक महिला संघाच्या सेक्रेटरी-कॉ. अहिल्या रांगणेकर ह्यांनी एकूण कार्याचा आढावा घेऊन आजच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीत स्त्रियांच्या पुढे कोणते प्रश्न उभे राहिले आहेत ते सांगितले.

कॉ. प्रभा सावंत यांनी श्रमिक महिला संघाची ध्येय धोरणे विशद केली. वाढत्या महागाईची, आर्थिक अरिष्टाची, सामाजिक अन्यायाची, लोकशाही हक्काच्या दडपशाहीची नोंद घेऊन महागाईविरुद्ध आणि समान अधिकार, कामगार कर्मचारी महिलांचे हक्क व सवलती, लोकशाही संस्थात प्रतिनिधीत्व व तेथील स्त्रियांच्या हक्काच्या संरक्षणासाठी लढा उभा करण्याचे आवाहन स्त्रियांना केले. लता भिसे ह्यांनी प्रभाताईच्या ठरावास पाठिंबा देऊन संघटनेच्या जोरावर आपण आपले प्रश्न सोडवू शकतो असे सांगितले.

प्रा. मधु परांजपे ह्यांनी स्त्री शिक्षणावर ठराव मांडला व आज देशात स्त्रियांची शिक्षणातून कशी हकालपट्टी होत आहे, स्त्रीच्या शैक्षणिक विकासाच्या संधि, रूढी, परंपरा, दारिद्र्य यामुळे हिसकावल्या जात आहेत असे सांगितले. शिक्षणविषयक मागण्यांचा खलिता अधिवेशना पुढे मांडला. स्त्रियांना शिक्षणात कशा अडचणी येतात, पाठ्यपुस्तकातले उतारे स्त्रियांवर अन्याय करणारे असतात. मुलीचे शिक्षण पूर्ण व्हायचे असेल तिला भांवडे संभाळावी लागू नयेत म्हणून बालवाड्यांची आवश्यकता आहे. वगैरे चर्चा झाली.

स्त्री कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. लोकल, बस मधील अडचणी, वेतनातील अडचणी, वसतिगृह विषयक प्रश्न, प्रसाधन गृहे, हंगामी नोकरी. इ. अनेक प्रश्न पुढे आले.

स्त्रियांवरील वाढते अत्याचार, सामाजिक अन्याय व विषमता यावरही या परिषदेत विचार करण्यात

( पान ३६ वर पहा )

माझं तरणपण इसरतेया
त्याच बालपण जोपासया
चाकरीत इचार येई मनात
सांभाळील का त्वो म्हातारपणात

शाळा सिकत बाळ होईल मोठं
तवा वाटल आशाळ ठेगणं
माझ्यं सोनुलं झोकात जाईन हापीसत
मिळल त्याला मान सनमानं

संपत आलं जस दयनं
तसं दुख बी संपल
संपतील हे वनवासी दिसं
हात जोडून सुख राहील उभं

मोहरलं मोहरलं माझ्यं मनं
फुललं फुललं बाळाचं जीवन
जीवनात नसलं कस्याचं उनं
जीवन जसं सावलीहूणं

मोहरलं मोहरलं माझ्यं मन
मनात नांदल आनंद
आनंदात मन बहरं
बहरात येईल सुखं

शरद कश्यप

---

( पान ३५ वरून पुढे चालू )

आला. स्त्रियांना वारसा हक्क मिळाला पाहिजे. हूंडा कायद्यात बदल हवा, देवदासीची प्रथा नष्ट व्हावी, तलाक पिडीत महिलांचे प्रश्न सुटावे, घटस्फोट कायदा स्त्रियांना जाचक ठरू नये इ. मागण्या करण्यात आल्या.

या श्रमिक महिला संघातील अधिवेशनात तंबाखू आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर, घराच्या प्रश्नावर काय काय करता येईल त्यावरही सविस्तर चर्चा झालीच पण महत्वाची गोष्ट म्हणजे स्त्रियांच्या स्त्री म्हणून येणाऱ्या आर्थिक सामाजिक प्रश्नाबरोबरच राखीव जागांना पाठिंबा देणाराही ठराव महिलांनी केला. प्रा. शोभा ठेकेदत्त, शालीनी बेहराम, आशा वर्तक, इंदुताई, विजया बोरीवले, अक्काताई नांगरेकर, देवयानी मोरे इत्यादिनी ठरावावर भाषणे केली.

या सर्व ठरावाबरोबरच साम्राज्यवादी शक्तीनी निरनिराळ्या देशात कष्टकरी जनतेविरूद्ध जी दडपशाही चालविलेली आहे त्याचा निषेध करण्यात आला. प्रत्येक ठरावावर स्त्रिया मनमोकळेपणाने आपले विचार मांडत होत्या. आलेल्या स्त्रिया या लढ्यामध्ये सहभागी झालेल्या स्त्रिया होत्या. त्यामुळे त्यांच्या मांडणीला कृतिचा ठोस पाया होता. स्त्रियांना वेगवेगळ्या क्षेत्रातील अनुभव ऐकायला मिळत होते. त्यावर चर्चा होत होती. स्त्रियांना आधीच लेखी ठराव दिले होते. त्याचाही चांगलाच उपयोग झाला. ठरावाप्रमाणे प्रत्येक ठिकाणी लढे, मोहिमा, आंदोलने करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोल्हापूरमधील वृत्तपत्रांनी या अधिवेशनाची दखल घेतली. कारण अधिवेशनात केवळ आर्थिक किंवा केवळ सामाजिक ठराव नव्हते तर स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, लोकशाही हक्कांचा विचार या अधिवेशनाने केला. दि. ३० मेला कोल्हापूर शहरातून स्त्रियांनी मोर्चा काढला. 'जनाब अंतुले हाय हाय, तलवार आणून करणार काय' या घोषणेने लोकांचे लक्ष चांगलेच वेधले. बिंदु चौकात स्त्रियांची प्रचंड सभा झाली. कॉ. अहिल्या रांगणेकर ह्यांनी सरकारच्या दिवाळखोर धोरणांचा धिक्कार केला व दडपशाही सहन केली जाणार नाही असे सांगितले.

दोन दिवस सांस्कृतिक कार्यक्रम होत होते. शाहीर गुलाब नदाफ ह्यांनी साखरेची गोष्ट हे पथनाट्य सादर केले.

श्रमिक महिला संघाच्या या दुसऱ्या अधिवेशनाने स्त्री मुक्ती लढ्याला शास्त्रशुद्ध विचार आणि कार्यक्रम नक्कीच दिला आहे.

बायजा प्रतिनिधी